


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड-महाराष्ट्र | रविवार दि. २६ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३८ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रुपये

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com










# देवस्थान इनाम जमीन आता शेतकऱ्यांच्या नावावर ! राज्य सरकारचा मोठा निर्णय

### ● विकास आणि विक्रीलाही मुभा

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्याच्या तयारीत राज्य सरकार आहे. राज्यातील साडेचार लाख हेक्टरहून अधिक देवस्थान इनाम जमीन आता प्रत्यक्षात शेती करणाऱ्या वहिवाटदार शेतकऱ्यांच्या नावावर करण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आला आहे. या निर्णयामुळे वर्षानुवर्षे जमीन कसूनही मालकी हक्क नसलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेष म्हणजे या जमिनींच्या विकास आणि हस्तांतरणावरील निर्बंधही हटविण्याची तयारी सरकार करत आहे.

### इतिहास आणि पार्श्वभूमी-

राजे-महाराजांच्या काळात मंदिर, मठ आणि देवस्थानांच्या व्यवस्थापनासाठी मोठ्या प्रमाणावर जमीन इनाम स्वरूपात देण्यात आली होती. विशेषतः कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात या जमिनींचे प्रमाण मोठे आहे. मात्र, या जमिनींवर पिढ्यानपिढ्या शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावावर मालकी नोंद नसल्याने अनेक कायदेशीर अडचणी निर्माण झाल्या होत्या.




### ● कायदा लवकरच लागू होणार

**महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार या संदर्भातील कायद्याचा मसुदा लवकरच सार्वजनिक केला जाणार आहे नागरिकांना एक महिन्याचा कालावधी हरकती व सूचना देण्यासाठी दिला जाणार आहे. जुलै महिन्यातील विधिमंडळ अधिवेशनात कायद्याला अंतिम मंजुरी दिली जाणार आहे या निर्णयाचा सर्वाधिक फायदा कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना होणार आहे, कारण या भागात देवस्थान इनाम जमिनींचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे.**

### ● सरकारचे नवीन धोरण काय आहे ?

सरकार लवकरच जाहीर करणार . असलेल्या नवीन धोरणानुसार: देवस्थान इनाम जमीन वहिवाटदार शेतकऱ्यांच्या नावावर केली जाणार. शेतकऱ्यांकडून अधिमूल्य आकारले जाणार. हे अधिमूल्य संबंधित देवस्थानाला देण्यात येणार. ज्या ठिकाणी पुजाऱ्यांचा ताबा आहे, त्यांनाही भरपाई दिली जाणार. जमिनीवरील हस्तांतरण आणि विकासावरील बंदी हटवली जाणार

### ● शेतकऱ्यांसाठी काय बदलणार ?

या निर्णयामुळे: शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीवर पूर्ण कायदेशीर हक्क मिळणार,जमीन विकणे, खरेदी करणे किंवा विकास करणे शक्य होणार,वर्षानुवर्षे सुरू असलेले जमिनीचे वाद कमी होण्याची शक्यता. ग्रामीण भागात विकासाला गती मिळणार.

# जिल्हा रुग्णालयात चोऱ्या

## सीएस सोळंके यांचे अक्षम्य दुर्लक्ष!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयाचा कारभार म्हणजे आंधळं दळतय अन कुत्र पीठ खातय असा झाला आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर सतीश सोळंके यांचा प्रशासनावर वचक नसल्याने इथे चोऱ्याचे प्रकार होऊ लागले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी रुग्णालय परिसराची पाहणी करत सूचना दिल्या असल्या तरी या सोळंके महाशयांच्या ढिसाळ कारभाराबाबत मात्र त्यांनी कठोर पावले उचलून कारवाई करणे अपेक्षित आहे. जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या बीड येथील जिल्हा रुग्णालयात गेल्या दहा-वीस वर्षात कधीच चोरीची किंवा मारामारीची घटना घडली नाही मात्र डॉक्टर सतीश सोळंके यांनी जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून जबाबदारी घेतल्यानंतर जिल्हा रुग्णालय कुठल्या ना कुठल्या वादात सापडल्याचे दिसत आहे.



जिल्हा रुग्णालयाची बेड संख्या ही ३०० पेक्षा अधिक असताना या ठिकाणी रुग्णांना वेळेवर वेळ मिळत नाही स्ट्रेचर उपलब्ध होत नाही ऑक्सिजन सिलेंडरचा ▶▶ उर्वरित पान २

# बीडमध्ये मोटार वायर चोरी प्रकरण उघड

## मध्यप्रदेशातील टोळीचा पर्दाफाश, ३ आरोपी अटकेत

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तलाव व नदीमध्ये बसवलेल्या मोटारींच्या वायर चोरीच्या घटना मागील काही दिवसांपासून सातत्याने घडत होत्या. बीड, परभणी आणि जालना जिल्ह्यातील या चोरीमुळे शेतकरी त्रस्त झाले होते. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाने सर्व घटनास्थळांची पाहणी करून तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, मध्यप्रदेशातील काही इसम रुद्राक्ष विक्रीच्या बहाण्याने गावोगाव फिरून रेकी करत होते. त्यानंतर रात्रीच्या वेळी शेतकऱ्यांच्या मोटारींच्या वायर चोरी करत होते. ही माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ कारवाई करत नाशिक जिल्ह्यातील नांदगाव येथे धाड टाकली. येथे संशयितांचा शोध घेऊन तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. यामध्ये धर्मेंद्र सुक्कल पारधी वय २५, वर्ष जि. कटनी, मध्यप्रदेश ,शेख शफीक शेख बाबू वय २५ वर्ष, माजलगाव, बीड,एक विधीसंघर्षग्रस्त बालक यांचा समावेश आहे. चौकशीदरम्यान आरोपींनी माजलगाव आणि केज परिसरातील विविध ठिकाणी एकूण ६ गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यांनी आणखी ▶▶ उर्वरित पान २ वर




# नातू जन्मल्याचा आनंद, पण घरफोडीने धक्का

**४.५० लाख रोख व ४ तोळे सोने लंपास ;घटनास्थळी पेठ बीड पोलीस दाखल**

बीड । प्रतिनिधी

एकीकडे घरात नातू झाल्याचा आनंद साजरा होत असतानाच दुसरीकडे घरफोडीच्या घटनेने जाधव कुटुंबाला मोठा आर्थिक धक्का बसला आहे. बीड शहरातील पेठ बीड परिसरात ही घटना घडली असून चोरट्यांनी घरातील सुमारे ४ लाख ५० हजार रुपये रोख रक्कम व ४ तोळे सोने लंपास केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार,



पेठ बीड भागात राहणारे सुनील अशोक जाधव यांना मुलगा झाल्यामुळे कुटुंबीय लातूर येथे नवजात बाळाला पाहण्यासाठी गेले होते. रात्री घरी परतल्यानंतर घरात चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून कपाटातील रोख रक्कम व दागिने चोरून नेले. ही रक्कम प्लॉट खरेदीसाठी साठवून ठेवली असल्याचे जाधव यांनी सांगितले. या घटनेमुळे कुटुंब आर्थिक अडचणीत सापडले असून आनंदाच्या ▶▶ उर्वरित पान २

# यावर्षी मान्सून लवकर! उकाड्यापासून दिलासा; पण पावसाबाबत IMD ची चिंता कायम

वृत्तसंस्था

देशभरात सध्या तीव्र उष्णतेची लाट सुरू असताना नागरिकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. युरोपियन सेंटर फॉर मिडीयम रेंज वेदर फॉरकास्ट च्या ताज्या अहवालानुसार, २०२६ मध्ये दक्षिण-पश्चिम मान्सून भारतात ठरलेल्या वेळेपेक्षा लवकर दाखल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मान्सून कधी येणार? ईसीएमडब्ल्यू एफ च्या अहवालानुसारअंदमान-निकोबार बेटांवर: १८ ते २५ मे दरम्यान तर केरळ मध्ये: २५ मेच्या आसपास मान्सूनचे आगमन होणार आहे त्यानंतर मान्सून हळूहळू संपूर्ण भारतभर पसरत उत्तर भारताकडे सरकणारयामुळे मे अखेरीसच देशातील अनेक भागांमध्ये पावसाची सुरुवात होण्याची शक्यता आहे. मान्सून लवकर येण्यामागची कारणे- हवामान तज्ज्ञांच्या मते अल निनो (El Ni0o) ची परिस्थिती कमकुवत राहण्याची शक्यता असल्याने पॉझिटिव्ह इंडियन डायपोल सक्रिय होण्याची चिन्हे या दोन्ही घटकांमुळे भारतात पाऊस लवकर सुरू होण्याची शक्यता वाढली आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर




# उष्माघाताचा कहर! लातूरमध्ये ९ महिन्याच्या बाळाचा मृत्यूचा संशय

लातूर । प्रतिनिधी

जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे उष्माघाताच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत आहे. औसा तालुक्यातील गोंद्री गावात नऊ महिन्यांच्या बाळाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.गेल्या काही दिवसांपासून लातूर जिल्ह्यात तापमानात सातत्याने वाढ होत असून दुपारच्या सुमारास तापमान ४० ते ४१ अंश सेल्सिअसपयरत पोहोचत आहे. तीव्र उन्हामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी वर्ग यांना उष्माघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. उष्णतेचा वाढता परिणाम सतत वाढणाऱ्या तापमानामुळे उष्माघाताच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. विशेषतः ग्रामीण भागात दुपारच्या वेळेत काम करणाऱ्या नागरिकांवर याचा अधिक परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.




# निराधार-अनाथ मुलांच्या मदतीसाठी युवासेना सदैव तत्पर असेल : विपुल पिंगळे, सागर बहिर



बीड । प्रतिनिधी

शिवसेनेच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या विचारसरणीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत, महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री मा.श्री. ना.प्रतापजी सरनाईक साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीड तालुक्यातील मौजे ढेकणमोह येथील पसायदान सेवा प्रकल्पात अनाथ मुलांसाठी समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. युवासेनेच्या वतीने या ठिकाणी मुलांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमामुळे अनाथ मुलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. यावेळी बोलताना आयोजक विपुल बाळासाहेब पिंगळे व सागर बहिर यांनी सांगितले की, समाजातील गरजू व वंचित घटकांसाठी कार्य करणे हीच खरी शिवसेनेची परंपरा आहे. युवासेना नेहमीच समाजकार्यात अग्रेसर राहील आणि प्रत्येक गरजू व्यक्तीच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील. या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत असून, सामाजिक बांधिलकी जपणारा हा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



# बौद्धिक संपदा : नवसर्जनाचे संरक्षक छत्र

दरवर्षी २६ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक बौद्धिक संपदा दिन' म्हणून साजरा केला जातो आणि हा दिवस मानवी सर्जनशीलतेच्या सामर्थ्याचा, ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेचा आणि नवोन्मेषाच्या प्रवाहाचा उत्सव म्हणून ओळखला जातो. मानवी सभ्यतेच्या उत्क्रांतीचा मागोवा घेतला असता असे स्पष्टपणे दिसून येते की, मानवाने आपल्या बुद्धीच्या, कल्पनाशक्तीच्या आणि सर्जनशीलतेच्या बळावरच समाज, संस्कृती, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची उभारणी केली आहे. या सर्व प्रक्रियेतून निर्माण होणारी बौद्धिक संपदा ही केवळ एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक मालमत्ता नसून ती समाजाच्या प्रगतीची पायाभूत शक्ती आहे. त्यामुळे या संपदेचे संरक्षण, संवर्धन आणि योग्य व्यवस्थापन करणे ही आधुनिक काळातील अत्यंत महत्त्वाची गरज ठरते.

'बौद्धिक संपदा' ही संकल्पना मूलतः मानवी बुद्धिमत्तेने साकारलेल्या निर्मितींशी संबंधित आहे. साहित्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला, वैज्ञानिक संशोधन, तांत्रिक शोध, औद्योगिक डिझाईन्स, व्यापारचिन्हे, भौगोलिक संकेत अशा विविध स्वरूपांमध्ये बौद्धिक संपदेचे अस्तित्व आढळते. या सर्व निर्मितींमध्ये सर्जनशीलता, मौलिकता आणि नवोन्मेष यांचे दर्शन घडते. या निर्मितींचे कायदेशीर संरक्षण करण्यासाठी विविध प्रकारचे बौद्धिक संपदा हक्क अस्तित्वात आले आहेत. कॉपीराइट, पेटंट, ट्रेडमार्क, औद्योगिक डिझाईन, भौगोलिक संकेत हे त्यातील प्रमुख प्रकार होत. या हक्कांमुळे सर्जकाला त्याच्या निर्मितीवर विशिष्ट कालावधीसाठी मालकी हक्क प्राप्त होतो आणि त्यातून आर्थिक व सामाजिक लाभ मिळवण्याची संधी उपलब्ध होते. जागतिक बौद्धिक संपदा दिन साजरा करण्यामागील उद्दिष्ट केवळ या संकल्पनेची माहिती देणे एवढ्यावर मर्यादित नाही, तर सर्जनशीलतेचा सन्मान करणे, नवोन्मेषाला प्रोत्साहन देणे आणि निर्मात्यांच्या हक्कांविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे हेही त्यामागील महत्त्वाचे हेतू आहेत. या दिवसाच्या निमित्ताने विविध देशांमध्ये शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे, उद्योगसंस्था आणि शासन यांच्याद्वारे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि सामान्य नागरिकांना बौद्धिक संपदेचे महत्त्व समजावून सांगितले जाते. विशेषतः तरुण पिढीमध्ये




नवकल्पनांची प्रेरणा निर्माण करणे आणि त्यांना त्यांच्या कल्पनांचे संरक्षण करण्याबाबत मार्गदर्शन करणे ही या उपक्रमांची मुख्य उद्दिष्टे असतात. आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात बौद्धिक संपदेचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, औषधनिर्मिती, कृत्रिम बुद्धिमत्ता, नॅनोतंत्रज्ञान अशा क्षेत्रांमध्ये सतत नवीन संशोधन होत आहे. या संशोधनातून निर्माण होणाऱ्या नवकल्पना आणि शोध यांचे संरक्षण करण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांची आवश्यकता अनिवार्य ठरते. एखाद्या संशोधकाने अथवा संस्थेने मोठ्या परिश्रमाने आणि गुंतवणुकीने तयार केलेल्या शोधाचे संरक्षण नसेल, तर त्या शोधाचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण होते आणि त्यामुळे संशोधनाची प्रेरणा कमी होऊ शकते. म्हणूनच बौद्धिक संपदा हक्क हे नवोन्मेषासाठी प्रोत्साहन देणारे महत्त्वाचे साधन मानले जाते. आर्थिक दृष्टीकोनातून पाहता, बौद्धिक संपदा ही आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. ज्ञानाधारित उद्योगांमध्ये बौद्धिक संपदेचे मूल्य प्रचंड असते. सॉफ्टवेअर उद्योग, मनोरंजन क्षेत्र, औषधनिर्मिती उद्योग, फॅशन उद्योग अशा विविध क्षेत्रांमध्ये बौद्धिक संपदेचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. या क्षेत्रांमध्ये निर्माण होणाऱ्या उत्पादनांचे आणि सेवांचे मूल्य त्यांच्या सर्जनशीलतेवर आणि नवोन्मेषावर अवलंबून असते. त्यामुळे या क्षेत्रांतील कंपन्या त्यांच्या बौद्धिक संपदेचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करतात. यामुळे आर्थिक विकासाला गती मिळते आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळते.

सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही बौद्धिक संपदेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रत्येक समाजाची एक वेगळी सांस्कृतिक ओळख असते आणि ही ओळख त्या समाजाच्या परंपरा, कला, साहित्य, लोकसंस्कृती यांमध्ये प्रतिबिंबित होते. या सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करणे हे देखील बौद्धिक संपदा व्यवस्थेचे एक महत्त्वाचे कार्य आहे. विशेषतः भौगोलिक संकेतांच्या माध्यमातून एखाद्या विशिष्ट प्रदेशातील उत्पादनांची ओळख जपली जाते. उदाहरणार्थ, एखाद्या प्रदेशातील हस्तकला, खाद्यपदार्थ किंवा कृषी उत्पादने यांना त्यांच्या विशिष्ट वैशिष्ट्यांमुळे विशेष दर्जा प्राप्त होतो आणि त्याचे संरक्षण केले जाते. यामुळे त्या प्रदेशातील कारागीर, शेतकरी आणि उत्पादक यांना आर्थिक लाभ मिळतो आणि त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचे जतन होते. तथापि, बौद्धिक संपदा हक्कांच्या अंमलबजावणीमध्ये अनेक आव्हानेही निर्माण झाली आहेत. विशेषतः डिजिटल युगात माहितीचे आदानप्रदान अत्यंत सुलभ झाले आहे. इंटरनेटच्या माध्यमातून साहित्य, संगीत, चित्रपट, सॉफ्टवेअर यांची सहज देवाणघेवाण होत असल्यामुळे कॉपीराइट उल्लंघनाच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. पायरेटसी, नकली उत्पादने, ट्रेडमार्कचे उल्लंघन या समस्या आज जागतिक स्तरावर गंभीर बनल्या आहेत. या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर कायदे, प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती आवश्यक आहे. भारतातील संदर्भात बौद्धिक संपदेचे महत्त्व विशेषत्वाने अधोरेखित होते. भारत हा सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि विविधतेने नटलेला देश आहे. येथे प्राचीन काळापासून विविध प्रकारचे पारंपरिक ज्ञान आणि कौशल्य विकसित झाले आहे. आयुर्वेद, योग, पारंपरिक औषधपद्धती, हस्तकला, लोककला, कृषी पद्धती या क्षेत्रांमध्ये भारताची समृद्ध परंपरा आहे. या पारंपरिक ज्ञानाचे संरक्षण करणे आणि त्याचा योग्य उपयोग करणे ही आजची गरज आहे. भौगोलिक संकेतांच्या माध्यमातून या परंपरांचे संरक्षण केले जाऊ शकते आणि त्यातून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. शैक्षणिक क्षेत्रात बौद्धिक संपदेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधन आणि विकास यांना प्रोत्साहन देण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि नवोन्मेषाची वृत्ती विकसित होते. तसेच, संशोधनातून निर्माण होणाऱ्या निष्कर्षांचे संरक्षण करून त्यांचा समाजहितासाठी उपयोग केला जाऊ शकतो. विद्यापीठे आणि संशोधन संस्था यांच्यामार्फत पेटंट्स, कॉपीराइट्स आणि इतर बौद्धिक संपदा हक्क मिळवण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. नैतिक दृष्टिकोनातून पाहता, बौद्धिक संपदेचा आदर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. एखाद्या व्यक्तीच्या श्रमांचे आणि सर्जनशीलतेचे योग्य मूल्यांकन करणे हे सामाजिक न्यायाच्या तत्त्वाशी सुसंगत आहे. जेव्हा आपण इतरांच्या निर्मितीचा विनापरवानगी वापर करतो, तेव्हा आपण त्या व्यक्तीच्या अधिकारांचे उल्लंघन करतो. त्यामुळे बौद्धिक संपदेबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून ही जाणीव वाढवता येऊ शकते.

डिजिटल युगात बौद्धिक संपदेच्या स्वरूपात मोठे बदल होत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, बिग डेटा यांसारख्या तंत्रज्ञानामुळे नवीन प्रकारच्या सर्जनशीलतेचा उदय होत आहे. या नव्या परिस्थितीत बौद्धिक संपदा हक्कांच्या व्याख्या आणि अंमलबजावणी यामध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. उदाहरणार्थ, कृत्रिम बुद्धिमत्तेने निर्माण केलेल्या कलाकृतींचे हक्क कोणाला द्यायचे, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. या संदर्भात जागतिक स्तरावर चर्चा सुरू आहे.

भारत सरकारने बौद्धिक संपदेच्या क्षेत्रात विविध धोरणे आणि योजना राबविल्या आहेत. स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी, संशोधनाला चालना देण्यासाठी आणि नवोन्मेषाला समर्थन देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. 'स्टार्टअप इंडिया', 'मेक इन इंडिया' यांसारख्या उपक्रमांमुळे तरुण उद्योजकांना संधी उपलब्ध होत आहे. यामुळे देशात नवकल्पनांचे वातावरण निर्माण होत आहे आणि आर्थिक विकासाला चालना मिळत आहे. तथापि, बौद्धिक संपदा हक्कांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अजूनही अनेक पावले उचलण्याची आवश्यकता आहे. विशेषतः ग्रामीण भागात आणि लघुउद्योगांमध्ये या हक्कांबाबत जागरूकता कमी आहे. त्यामुळे या क्षेत्रांमध्ये जनजागृती कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. तसेच, न्यायालयीन प्रक्रिया सुलभ करणे, तक्रारींचे जलद निवारण करणे आणि तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणेही गरजेचे आहे.

जागतिक बौद्धिक संपदा दिन हा सर्जनशीलतेचा, नवोन्मेषाचा आणि ज्ञानाचा उत्सव आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण आपल्या समाजात बौद्धिक संपदेचा आदर करण्याची संस्कृती विकसित केली पाहिजे. सर्जकांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि नवकल्पनांना चालना देणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. यामुळेच समाजाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल. अखेर, बौद्धिक संपदा ही मानवाच्या प्रगतीचा मूलाधार आहे. तिचे संरक्षण आणि संवर्धन केल्याशिवाय शाश्वत विकास साध्य होऊ शकत नाही. त्यामुळे जागतिक बौद्धिक संपदा दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी सर्जनशीलतेचा सन्मान करण्याचा, नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचा आणि बौद्धिक संपदेच्या संरक्षणासाठी सक्रिय भूमिका घेण्याचा संकल्प केला पाहिजे. हीच या दिवसाची खरी उपयुक्तता आणि महत्ता आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

◆ पान १ वरून पुढे...

## जिल्हा रुग्णालयात....

तुटवडा नेहमीच असतो कर्मचारी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना दमदाटी करतात तसेच रुग्णालय परिसरात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता असल्याच्या तक्रारी आहेत. अनेक वार्डात एसी खराब असल्याने किंवा पाईप चोरीला गेल्याने कुलर लावण्याची वेळ आली आहे. मागील आठवड्यात रुग्णालयाची नवीन इमारत असलेल्या परिसरात लावलेले एयर कंडीशन चे महागडे पाईप अज्ञात लोकांनी चोरी करून नेले ज्या इमारतीचा ताबा अद्याप रुग्णालयाकडे आलेला नाही तोपर्यंत जर या ठिकाणी चोरी होणार असेल तर सीएस सोळंके आणि त्यांचे प्रशासन हजामती करते की काय अशी चर्चा रंगू लागली आहे. जिल्हा रुग्णालयाच्या भ्रष्ट आणि निकृष्ट कारभारामुळे जिल्ह्याच्या अब्रूचे धनवडे निघाले आहेत ही गोष्ट लक्षात आल्यानंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी रुग्णालयाला भेट दिली दोशींवर कारवाई करण्याचे आदेशही दिले परंतु सोळंके यांच्या ढिसाळ कारभारामुळेच येथे चोऱ्या होणे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मारहाण होणे त्यांना वेळेवर सुविधा उपलब्ध न होणे असे जे काही प्रकार होत आहेत त्याला जबाबदार धरून सोळंके यांच्यावरच कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## बीडमध्ये मोटार....

८ साथीदारांच्या मदतीने ही चोरी केली असल्याचे समोर आले आहे. आरोपीकडून गुन्ह्याच्या वेळी वापरण्यात आलेल्या २ मोटारसायकल किंमत सुमारे १.५ लाख रुपये असा मुद्देमल जप्त करण्यात आलास.दर तिन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी केज पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, उर्वरित ८ फरार आरोपींचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात पोउपनि महेश विघ्ने, पोहवा महेश जोगदंड, जफर पठाण, दिलीप गित्ते, बप्पासाहेब घोडके आणि गणेश मराडे यांचा समावेश होता.

## नातू जन्मल्याचा....

क्षणीच दु:खाचा डोंगर कोसळल्याची भावना व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच पेठ बीड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घराची पाहणी करून फिंगरप्रिंट घेतले असून पुढील तपास सुरू आहे. घरात कोणी नसल्याची माहिती मिळवून चोरट्यांनी रेकी करूनच ही चोरी केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पुढील तपास पेठ बीड पोलीस करत आहेत.

## यावर्षी मान्सून....

IMD चा इशारा: पाऊस कमी पडू शकतो. जरी मान्सून लवकर येणार असला, तरी भारतीय हवामान विभागाने ने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार २०२६ चा पावसाळा पूर्णपणे समाधानकारक असेलच असे नाही. जून ते सप्टेंबर दरम्यान पाऊस सरासरीच्या LPA च्या ९०% ते ९५% पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.काही भागात सरासरीपेक्षा कमी पाऊस होणार आहे.काही राज्यांमध्ये कमी पावसामुळे शेतीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## आमदार राहुल कुल...

शितोळे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पदभार स्वीकारला. वसंतराव साळुंखे हे जय शिवसंग्राम संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष म्हणून राष्ट्रीय अध्यक्ष रामहरी मेटे यांच्या नेतृत्वाखाली संघटनेत कामकाज करीत असून स्व.आमदार लोकनेते विनायकराव मेटे यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम वसंतराव साळुंखे हे संपूर्ण महाराष्ट्रभर करत असून ते एक आक्रमक व सर्वसामान्य माणसावर झालेल्या अन्यायाविरुद्ध न्याय हक्कासाठी झगडून काम करणारे चळवळीतील कार्यकर्ते आहेत

## बीड जिल्ह्यातील....

करण्यासाठी बीड जिल्हा महिला आघाडीची आढावा बैठक आंबेजोगाई येथील शासकीय विश्रामगृहावर आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस शिवसेना महिला संपर्क प्रमुख बीड, धाराशिव, तथा महाराष्ट्र राज्य महीला आयोगाच्या सदस्य अॅड.संगीताताई चव्हाण यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. या बैठकीस संबोधित करताना महिला आघाडी बळकट करण्यासाठी 'गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिवसैनिक' यावर लक्ष केंद्रित करण्यावर जोर दिला. महिला आघाडीत पदभरणे, शाखा वाढवणे, महिला आघाडी ची बैठक लावणे यावर चर्चा करण्यात आली. या वेळी पदाधिकाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या बैठकीस मिरा आडे, उपजिल्हा प्रमुख अंबेजोगाई, सूनिता जाधव, तालुका प्रमुख, अंबेजोगाई, जया राऊत, तालूका प्रमुख, केज, यशोदा राठोड़, तालुका प्रमुख परळी, जयश्री पिपरे, अंबाजोगाई, आम्रपाली निसर्गंद, वर्षा मस्के, जयश्री मोरे, जयश्री गवळी, सुर्वाणा वाघमारे, सुमन गुरखेल, गंगुबाई पवार, मोहिनी कांबळे आणि इतर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## शारदा हॉस्पिटलच्या....

आजारावर मोफत औषध उपचार करण्यात आले. शिबिरात हॉस्पिटलचे मेडिकल सुप्रिडेंट डॉ.अजयसिंह पंडित, डॉ धनश्री पंडित , डॉ निखिल गव्हाणे, डॉ प्राजक्ता नरोटे , डॉ विवेक काळे, डॉ अंकिता चाळक, डॉ किरण जाधव, डॉ मनोज कुमार इत्यादींनी उपचार केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी हॉस्पिटलचे शिबिर समन्वयक भोसले तात्यासाहेब, प्रा. बबन काकडे, नर्सिंग स्टाफ माळवे मॅडम, फार्मसीचे आनंद भगत, श्री.राठोड सर, सौरभ पोटे, अमित बागल, श्रद्धा वादे, पुनम पवार, शीतल साळवे, सागर प्रधान, प्राचार्य हाटकर, पर्यवेक्षक लाड सर, उच्च माध्यमिक विभाग प्रमुख प्रा.पाठक प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती बोबडे मॅडम आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जाधव एल.जे. यांनी केले. शिबिराचे प्रास्ताविक मुख्याध्यापक हाटकर यांनी केले तर प्रा.पैठणे यांच्या आभार प्रदर्शनाने शिबिराची सांगता झाली. यावेळी तलवाडा आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड शहर स्वच्छतेत....

हालचाल, त्यांचे वेळापत्रक, तसेच कामाची अंमलबजावणी यावर थेट नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. त्यामुळे कोणते वाहन कोणत्या भागात किती वेळ कार्यरत आहे, काम पूर्ण झाले आहे की नाही, याची अचूक माहिती प्रशासनाला रिअल-टाइममध्ये मिळणार आहे.! या नव्या तंत्रज्ञानामुळे स्वच्छता कामकाजातील ढिलाई, अनियमितता आणि गैरव्यवहाराला आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. तसेच नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींचे तत्काळ निवारण करण्यासाठीही ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे. शहरातील प्रत्येक प्रभागात स्वच्छता सेवा वेळेवर आणि नियोजनबद्ध पद्धतीने पोहोचवण्यास या उपक्रमाची मोठी मदत होणार आहे.! स्वच्छता सभापती शेख निजाम यांनी यावेळी सांगितले की, ऋझड प्रणालीच्या वापरामुळे स्वच्छता व्यवस्थापन अधिक गतिमान आणि पारदर्शक होईल. नागरिकांना वेळेवर सेवा देणे आणि शहर अधिक स्वच्छ ठेवणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट असून, या प्रणालीमुळे त्या दिशेने निश्चितच सकारात्मक बदल घडेल. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, लवकरच शहरातील सर्व घंटागाड्यांवर पूर्णपणे ऋझड प्रणाली कार्यान्वित करून त्याचे प्रात्यक्षिक देखील सादर करण्यात येणार आहे.! यावेळी स्वच्छता निरीक्षक भागवत जाधव यांच्यासह, मुकादम तसेच घंटागाडी चालक उपस्थित होते. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे बीड शहर स्वच्छतेच्या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करत पुढे जात असून, नागरिकांना अधिक दर्जेदार सेवा देण्याचा ठोस प्रयत्न सुरू असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

## टाकरवन येथील...

भ्रष्टाचार युक्त, चालू असल्यामुळे, ते शासनाने प्रमाणित केलेल्या इस्टिमेंट प्रमाणे करावे. आणि संबंधित चौकशी समिती मधील सदस्यांची चौकशी करून त्यांच्यावर शासकीय स्तरावर कार्यवाही करावी. अशी मागणी मानवी हक्क अभियान तालुका सचिव कपिल आडागळे यांनी माहिती अधिकारात केली आहे तसेच आपल्या स्तरावर नवीन चौकशी स्थापन करण्या संदर्भात ५ मे २००२६ रोजी धरणे आंदोलन करणे बाबत इशारा देण्यात आला आहे या तक्रारीची दखल घेऊन २० एप्रिल २००२६ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना चौकशीचे आदेश देऊन मुद्देनिहाय तक्रारीची चौकशी करुन, तसेच आपल्या स्तरावर नियमोचित कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीची माहिती, अर्जदारास आपले स्तरावरुन परस्पर कळविण्यात यावी व तसेच तक्रारदार यांच्या तक्रारीचे निरसन आपले स्तरावरुन करुन त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास दिनांक २७/४/२००२६ पर्यंत सादर करण्यात यावा, असे आदेश देण्यात आले. ५ मे २००२६ रोजी पुन्हा धरणे आंदोलनाचा इशारा- तक्रारदाराने प्रशासनाला देत सांगितले आहे की, जर याप्रकरणी तातडीने कारवाई करून नवीन चौकशी समिती स्थापन केली नाही, तर ५ मे २००२६ रोजी पुन्हा धरणे आंदोलन करण्यात येईल.

## टक्केवारी घेतल्यामुळे....

शेतकऱ्याचा मोठ्या प्रमाणावर पिक विमा मिळण्यामध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. २०२० पासून आज पर्यंत खाजगी पिक विमा कंपन्याकडून कृषीचे प्रशासकीय अधिकारी आजी माजी मंत्री यांनी सर्व कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला विमा मिळत नाही. प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत सर्व वेगवेगळे निकष केंद्र व राज्य सरकारच्या नियमावली पिके पेरणी पासून काढणी पर्यंत कालावधीमध्ये अतिवृष्टी वीज कोसळणे गारपीट वादळ चक्रीवादळ दुष्काळ कमी जास्त पाऊस पडल्यामुळे शेतीच्या उत्पन्नावर परिणाम होतो या सर्व नियमाचे शासनाकडून विमा कंपन्याकडून पडताळणी करून विविध जिल्हास्तरीय नियमाचे तपासणी केल्यानंतर पिक विमा संदर्भात निर्णय घेतला जातो परंतु सर्व नियमाचे उल्लंघन करण्यात ईडी व त्रिमूर्ती सरकारमधील लोक प्रतिनिधी मंत्री प्रशासकीय यंत्रणा जबाबदार आहे. केंद्र व राज्य सरकारच्या पीक विमा योजनेअंतर्गत सरकारकडून २० ते ३५ टक्के पीक विमा कंपन्यांना कमिशन मिळते. परंतु केंद्र व राज्य सरकार तसेच उच्च न्यायालयाचे आदेशाचे ही खाजगी विमा कंपन्या पालन करीत नाहीत.पिक विमा कंपन्यावर शासनाचे नियंत्रण नाही सर्व स्तरात पिक विमा मिळण्यास शेतकऱ्याला अडचणी निर्माण होत आहेत, तरी ही शासनाकडून पिक विमा कंपन्यावर काळया यादीत टाकण्याची कारवाई केली जात नाही. २०२५ च्या पीक विम्या संदर्भात तर अतिवृष्टीमुळे हाहाकार माजलेला होता सर्व स्तरावर पिकांची शेतकऱ्याची प्रचंड नुकसान झालेली आहे. तरी ही खाजगी पिक विमा कंपन्यांनी पर्जन्यमापक यंत्रणा व हवामान केंद्राचे अधिकारी तसेच महसूल, कृषी अधिकारी ,लोकप्रतिनिधी, आजी माझी कृषिमंत्री कृषी आयुक्त, सांख्यिकी विभागाचा प्रमुख यांच्याबरोबर टक्केवारी देऊन तडजोड केल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा मिळण्यास विलंब लागणार असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला .

## शहीद कॉम्रेड...

आंदोलनकर्त्यांनी नमूद केले. या वक्तव्याचाही तीव्र निषेध करण्यात आला. शनिवार (दि.२५ एप्रिल) रोजी सकाळी लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलनकर्त्यांनी आ. संजय गायकवाड यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त केला. या वेळी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक, बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन पाठविण्यात आले. या आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, विक्रांत वाणी, बाळकृष्ण थोरात, श्रीहरी निर्मळ, भगवान मोरे, रामचंद्र मुळे, सुरेश निर्मळ, सुरज कदम, संतोष भोसले, दादा गायकवाड, दिपक थोरात, गुलाब कांबळे, पप्पू निर्मळ, रावसाहेब निर्मळ, भालचंद्र कुदळे आदी शिवप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शासनाच्या जाचक नियम अटी व अडचणी संदर्भात कृषी सेवा केंद्र चालकांचा बेमुदत महाराष्ट्र बंद

### वडवणी तालुका कृषी असोसिएशनचा जाहीर पाठिंबा व बंद मध्ये सहभागी

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टीसाईड्स, सीड्स डीलर्स असोसिएशन ,पुणे यांच्या नेतृत्वाखाली पुकारण्यात आलेल्या राज्यव्यापी बेमुदत महाराष्ट्र बंदला वडवणी तालुका कृषी साहित्य विक्रेता असोसिएशन'ने जाहीर पाठिंबा दिला आहे. अनधिकृत एच टी बी टी बियाणे विक्रीच्या विरोधात,खत कंपन्याकडून केल्या जाणारी लिंकिंग च्या विरोधात,अवैध कीटकनाशके व खते थेट शेतकऱ्याला अनधिकृत एजंट द्वारे विक्री करण्याच्या विरोधात,जाचक साथी ॲपच्या माध्यमातून बियाणे विक्री अनिवार्य करण्याच्या विरोधात,किरकोळ खत विक्रेत्यावर लादलेल्या जाचक नियम च्या विरोधात,कीटकनाशक कंपनी कडून एक्सपायरी मटेरियल वापस नं घेण्याच्या विरोधात, इन्स्पेक्टर राज मध्ये पुन्हा वाढ केल्याच्या विरोधात,नवीन लागू होणारे जाचक बियाणे व कीटकनाशक कायदा विरोधात,दुकानदाराला सील बंद कृषी निविष्ठा विक्री



केल्यावरही शिक्षा होते या अन्याया विरोधात,सरकारच्या जाचक अटींविरोधात आणि प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ पासून वडवणी तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्र चालक या बेमुदत महाराष्ट्र बंदमध्ये सहभागी होणार असून आपली दुकाने कडकडीत बंद ठेवणार आहेत. कृषी निविष्ठा (बियाणे, खते, कीटकनाशके) विक्रेत्यांच्या अनेक अडचणी व मागण्या गेल्या ४-५ वर्षांपासून प्रलंबित आहेत. राज्याच्या कृषी विभागाकडून यावर वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस अंमलबजावणी न झाल्याने राज्यातील सर्व कृषी केंद्र चालकांमध्ये तीव्र नाराजीची भावना आहे. या संदर्भात 'माफदा' संघटनेने कृषी विभागाला सविस्तर निवेदन दिले असून, या मागण्या तत्काळ मंजूर न झाल्यास २७तारखेपासून बेमुदत बंदचा हत्यार उपसण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कृषी सेवा केंद्र चालकांच्या प्रमुख मागण्याः १. खत कंपन्यांकडून खतांचा पुरवठा होताना केले जाणारे 'लिंकिंग' (इतर उत्पादने घेण्याची सक्ती) त्वरित बंद व्हावे. २. सीलबंद पाकिटातील बियाणे, खते किंवा कीटकनाशकांचे नमुने तपासणीत अप्रमाणित (Fail) आढळल्यास, विक्रेत्याला 'आरोपी' न करता कायद्यातील तरतुदीनुसार 'साक्षीदार' मानावे. ३. मुदतबाह्य (Expired) कीटकनाशके परत घेण्याची सक्ती विक्रेत्यांवर न करता उत्पादक कंपन्यांवर करावी. ४. खतांवरील नफा (मार्जिन) आयकर व जीएसटी खर्चाचा विचार करून ८ टक्के करण्यात यावा. तसेच सर्व खते विक्रेत्यांच्या दुकानापर्यंत 'FOR' पद्धतीने मिळावीत. ५. 'साथी पोर्टल'चा (Sathi Portal) वापर करण्याची सक्ती किरकोळ विक्रेत्यांवर न करता बियाणे उत्पादक व पुरवठादार कंपन्यांवर करावी. ६. केंद्र शासनाचे कृषी विभागाकडून प्रस्तावित नवीन बियाणे व कीटकनाशके कायदा २०२५ मधील जाचक नियम शिथिल करावेत. या बेमुदत बंदच्या काळात ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी बांधवांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. मात्र, हा लढा अंतिमतः शेतकरी बांधवांच्या आणि कृषी सेवा केंद्र चालकांच्या हितासाठीच असल्याचे असोसिएशनने म्हटले आहे. बंद काळात होणाऱ्या समस्यांबद्दल वडवणी तालुका कृषी साहित्य विक्रेता असोसिएशनने शेतकऱ्यांबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे.

## इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनां नामांकित शाळेत प्रवेश घेण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, व लातूर या जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुला मुलींना इयत्ता पहिली (१ ) मध्ये शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेवु इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. अर्जासोबत अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत असावी. विद्यार्थी दारिद्रय रेषेखालील असेल तर त्यासंबंधीत छायांकित प्रत व दारिद्रय रेषा अनु क्रमांक नमुद करावा, पालकाची उत्पन्न मर्यादा ही १ लाख एवढी असुन यासाठी सक्षम अधिका-याने दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र देण्यात यावे. अर्जासोबत पालकांनी समंतीपत्रक देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, दोन पासपोर्ट साईजचे फोटो, जन्म तारखेचा पुरावा व वैद्यकिय अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. या योजनेत आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना तसेच विधवा, घटस्फोटीत, निराधार व दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील पाल्याला प्रथम प्राधान्य देण्यात येईल विद्यार्थ्यांचे पालक शासकीय /निमशासकीय नोकरदार नसावेत प्रकल्प कार्यालयात प्रवेश अर्ज विनामुल्य उपलब्ध असुन दिनांक २५ ने २०२६ पर्यंत परिपुर्ण प्रवेश अर्ज जमा करणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांवर होणारा संपुर्ण खर्च आदिवासी विकास विभाग करणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, रिलायन्स मॉलच्या पाठीमागे, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे शिक्षण विभागात संपर्क साधावा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या पाल्यास शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत प्रवेश घेण्याचे आवाहन छत्रपती संभाजीनगर, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे, प्रकल्प अधिकारी, यांनी केले आहे.

## संगीतमय कथेचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

बीड (प्रतिनिधी):- भारतीय संस्कृती, संत विचार जगाच्या पाठीवर सर्वश्रेष्ठ आहे. हेच विचार गत २५ वर्षापासून स्व.झुंबरलालजी खटोड प्रतिष्ठान व सर्व भाविक-भक्तांच्या पाठबळामुळे व आर्थिक सहकार्यामुळे अखंडीतपणे संत विचार मांडण्याचे काम चालू आहे. यंदाच्या वर्षी देखील स्व.झुंबरलालजी खटोड प्रतिष्ठानच्यावतीने यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे ५ मे ११ मे विविध संगीतमय कथेचे आयोजन करण्यात आले असून सर्व भाविकांसाठी प्रवेश विनामुल्य आहे. सर्व भाविक-भक्तांनी संगीतमय कथेचा लाभ घेण्याचे आवाहन प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे.

## ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामामुळे बीडमध्ये सकारात्मक परिवर्तन!

### माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांचीही भेट ; शेती - मातीच्या विषयावर सखोल चर्चा

**परळी वै. । प्रतिनिधी**

कधीकाळी तीव्र दुष्काळ, शेतीचे अपयश आणि मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर यासाठी ओळखला जाणारा बीड जिल्हा आज हळूहळू सकारात्मक बदलाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र दिसत आहे. या परिवर्तनामागे ग्लोबल विकास ट्रस्टच्या सातत्यपूर्ण आणि शाश्वत कामाची मोठी भूमिका असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केले. २०१२ साली बीड जिल्ह्यात प्रथम दौरा केल्याच्या आठवणी



सांगताना त्या म्हणाल्या, त्या वेळी अनेक गावांमध्ये अत्यंत विदारक परिस्थिती होती. पाण्याचा तीव्र दुष्काळ, शेती संकटात आणि गावात केवळ लहान मुले व वृद्धच दिसत असत. मात्र गेल्या काही वर्षांत झालेल्या कामांमुळे आज या परिस्थितीत लक्षणीय बदल झालेला दिसतो.

त्या पुढे म्हणाल्या की, २०१६ पासून माझे बंधू मयंक गांधी आणि संजय परमार यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी केलेल्या कामामुळे हा बदल शक्य झाला आहे. फळबाग लागवडीसाठी प्रोत्साहन, आधुनिक तांत्रिक मार्गदर्शन आणि थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दिलेला आधार यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. परिणामी, शेतीकडे पुन्हा ओढ निर्माण झाली असून जिल्ह्यातील स्थलांतरालाही आळा बसला आहे. जलसंधारणाच्या प्रभावी कामांमुळे शेतीला पाणी उपलब्ध होणे ही या बदलाची सर्वात महत्त्वाची बाजू असल्याचे त्यांनी नमूद केले.

## 'ओम' यांनी धर्मदाय आयुक्त पदाचे शिखर परीक्षेतून मिळवावे : इंजी.अजिंक्य आनेराव

### धर्मदाय निरीक्षक परीक्षेत एनटी ब प्रवर्गात राज्यात प्रथम रँक मिळवल्याबद्दल ओम गायकवाड यांचा सत्कार कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

ओम गायकवाड यांनी धर्मादाय आयुक्त कार्यालयांतर्गत २०२५ मध्ये महाराष्ट्र लोक सेवा आयोग सरळसेवा भरतीद्वारे परीक्षेत यश संपदान करत राज्यात ओपनमधून ९४ वा रँक तर एनटी ब प्रवर्गातून राज्यात प्रथम रँक मिळवले आहे. त्यांना धर्मदाय निरीक्षक हे पद मिळणार असून त्यांनी यावरच न थांबता कर्तव्य बजावत पुढील धर्मदाय आयुक्त पदाचे शिखर परीक्षेतून मिळवावे, असे मत राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस (अजित



पवार गट) बीड जिल्हाध्यक्ष तथा इंजिनिअर अजिंक्य आनेराव यांनी व्यक्त केले. बीड शहरातील प्रल्हादराव गायकवाड यांचे नातू ओम स्मिता संजय गायकवाड धर्मदाय निरीक्षक पदाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल कौटुंबिक सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी बीड जिल्हाध्यक्ष तथा इंजिनिअर अजिंक्य आनेराव बोलत होते. व्यासपीठावर प्रल्हादराव गायकवाड (आजोबा), संजय गायकवाड (वडील), अजय गायकवाड (काका), स्मिता गायकवाड (आई), मिरा गायकवाड (काकू), पत्रकार रवी उबाळे उपस्थित होते. इंजिनिअर अजिंक्य आनेराव हे बीड जिल्ह्यातील एक सक्रिय युवा नेते आहेत. ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी (अजित पवार गट) संबंधित असून, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या बीड जिल्हाध्यक्ष पदावर कार्यरत आहेत. ते म्हणाले, धर्मदाय निरीक्षक या संवर्गातील एकूण १२१ पदे भरण्यासाठी २०२५ जाहिरात प्रसिद्ध झाली होती. याचा निकाल ९ फेब्रुवारी २०२६ रोजी अधिकृतपणे निकाल जाहीर झाला. या पदामुळे समाजात मोठी प्रतिष्ठा मिळते कारण तुम्हाला मोठ्या मंदिरांचे ट्रस्ट, शैक्षणिक संस्था आणि रुग्णालये यांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याचे अधिकार असतात. ओम यांनी प्रतिकुल परिस्थितीवर मात करत हे यश संपदन केलेले आहे. त्यांनी येणाऱ्या काळात कर्तव्य बजावत धर्मदाय विभाग अंतर्गत असणारे मोठे पद म्हणजे आयुक्त या पदाच्या परीक्षेतही यश मिळवावे, अशा शुभेच्छा दिल्या.

## जिल्हास्तरीय मुलींची खो-खो स्पर्धा २ मे रोजी बीडमध्ये

**बीड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, राजमाता इंग्लिश स्कूल, बीड व एमॅच्युअर खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०२ मे २०२६ रोजी जिल्हास्तरीय मुलींची खो-खो स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा श्री. विश्वनाथराव जाधव माणूसमारे (काका), संचालक श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ, बीड यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात येत आहे.या स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ७.०० वाजता होणार असून १७ वर्षांखालील मुलींसाठी ही स्पर्धा आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे अध्यक्ष श्री. बलभीमराव जाहेर पाटील राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके यांची उपस्थिती राहणार आहे. ही स्पर्धा राजर्षी शाहू कन्या विद्यालय, तेलगाव रोड, बीड येथे होणार आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक म्हणून एमॅच्युअर खो-खो असोसिएशनचे पदाधिकारी ऋषिकेश शेळके (अध्यक्ष), विजय जाहेर (सचिव) व योगेश सोळसे (कोषाध्यक्ष) तसेच शाळेचे शिक्षक व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील विविध शाळांनी सहभाग नोंदवावा, यासाठी नोंदणीसाठी संपर्क - टी. जी. करांडे (मो. ९५७९२७८३८५) व व्हि. डि. मातकर (मो. ९६९९६६७१९३) यांच्याशी संपर्क साधावा,

### बीड जिल्ह्यात 'जागतिक हिवताप दिन' निमित्त जनजागृतीचे जिल्हा हिवताप अधिकारी श्री.विजयसिंह शिंदे यांचे आवाहन



**बीड । प्रतिनिधी**

दरवर्षी २५ एप्रिल हा दिवस वर्ल्ड मलेरिया डे अर्थात जागतिक हिवताप दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त संपूर्ण एप्रिल महिना हिवताप जनजागृती महिन्याच्या स्वरूपात साजरा करण्यात येत असून नागरिकांमध्ये हिवतापाविषयी जागरूकता निर्माण करणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे आणि लोकसहभाग वाढविणे हा मुख्य उद्देश आहे.

जिल्हा हिवताप अधिकारी श्री. विजयसिंह शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यात मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये डास अळी सर्वेक्षण, अबेटिंग, जलद ताप सर्वेक्षण तसेच डास अळी भक्षक गप्पी मासे सोडणे यांचा समावेश आहे. आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर यांच्या माध्यमातून गावपातळीवर सक्रिय काम सुरू आहे.

यासोबतच ग्रामपंचायत व नगर परिषद यांच्या सहकार्याने स्वच्छता उपक्रम राबविणे, संडासच्या व्हेंट पाईपला जाळ्या बसविणे, तसेच गटसभा, शालेय आरोग्य शिक्षण व माता बैठकींद्वारे जनजागृती केली जात आहे.

# 'चर्चेतील चेहरा' कार्यक्रमात आदर्श सरपंच मयुर आंधळे यांचा केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते सन्मानित

### प्रसिद्ध रामा इंटरनॅशनल हॉटेल मध्ये झालेल्या दिमाखदार सोहळ्यात झाला गौरव

**वडवणी । प्रतिनिधी**

समाजामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये व गाव विकासामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या चर्चेतील चेहऱ्यांची निवड करून त्यांना सन्मानित करण्याचे ठरविले.त्यामध्ये वडवणी तालुक्यातील रुई गावचे आदर्श व युवा सरपंच मयूर आंधळे यांचीही निवड करण्यात आली होती.केंद्रीय मंत्री व विधान परिषदेचे सभापती यांच्या हस्ते मयुर आंधळे यांचा कुटुंबीयांसह गौरव करण्यात आला.

यावेळी दिव्य मराठीचे संपादक,प्रणव गोळवळकर,सीईओ नितिश जैन,जाहिरात विभागाचे प्रमुख सुभाष बोंद्रे,जाहिरात विभागाचे विभागीय व्यवस्थापक ज्ञानेश्वर देवकते, वडील माजी सरपंच श्री. शंकरराव आंधळे, आई सौ. छायाताई आंधळे, मोठे बंधू भाजपा युवा मोर्चा बीड अध्यक्ष श्री. संजय आंधळे, नगरसेवक श्री. अमोल आंधळे, पत्रकार जानकिराम उजगरे, श्री. शुभम जायभाये, कृष्णा आंधळे व इतर ग्रा प सदस्य यांच्यासह संपुर्ण टिम व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.बुधवार दिनांक २२ एप्रिल रोजी छत्रपती



**करत असलेल्या कामावर प्रेम केल्यावर कौतुक होते**

**कोणत्याही क्षेत्रात आपण स्वत: जे काम करतो ते काम मनातून केले.आणि त्या कामावर प्रेम केले तर त्या कामाची दखल घेतल्या जाते. तसेच कोणतेही काम साधे किंवा कमी नसते. त्या कामाला उच्च दर्जा देणारा माणूस जर योग्य असेल तर तो माणूस उंच शिखरावर जाऊन पोहोचतो. असे मत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी या कार्यक्रमा दरम्यान व्यक्त केले.**

संभाजीनगर येथील प्रसिद्ध असलेल्या फाईव्ह स्टार रामा इंटरनॅशनल या हॉटेलमध्ये झालेल्या दिमाखदार सन्मान सोहळ्यामध्ये.वडवणी तालुक्यातील रुई गावचे आदर्श व युवा सरपंच मयूर आंधळे यांचा चर्चे तील चेहरा या सनमानसोळ्यात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.त्यांनी रुई गावामध्ये केलेल्या स्वच्छता,पर्यावरण, शैक्षणिक, सामाजिक, वयोवृद्धांना मदत, रक्तदान, गुणवंतांचा सत्कार,रस्ते, अंडरग्राऊंड नाली,पथदिवे,मंदीर,सभाग्रह,गावच्या जत्रामधुन सामाजिक संदेश,कुस्त्यांची दंगल १०० विकास कामापैकी केलेले ५८ काम तर ५० सामाजिक उपक्रमापैकी ३८ केले कामे आशा आभुतपूर्व कामाची दखल दैनिक दिव्य मराठीने घेऊन ती समाजासमोर मांडली. याची दखल थेट केंद्रीय मंत्री व विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी घेतली आणि दैनिक दिव्य मराठीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात यांचा गौरव केला.बोलताना विधान परिषदेचे सभापती राम शिंदे म्हणाले की,समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय व अ वर्णनीय काम करणाऱ्या चर्चेतील चेहऱ्याची निवड दैनिक दिव्य मराठी ने केली ती अत्यंत योग्य व न्याय आहे.प्रत्येक क्षेत्रात काम करताना आपल्या कामावर प्रेम केल्यानंतर त्या कामाची चर्चा झाल्याशिवाय राहत नाही. असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दैनिक दिव्य मराठीचे जाहिरात विभागाचे सॅटॅलाइट हेड सुभाष बोंद्रे यांनी केले.

दैनिक मराठवाडा पत्र

▸▸ रविवार दि. २६ एप्रिल २०२६ ▸▸ Page 4

## आमदार राहुल कुल यांना धक्का भीमा पाटस चे संचालक मंडळ बरखास्त



**दौंड। प्रतिनिधी**

भीमा सहकारी साखर कारखाना पाटस चे आमदार राहुल कुल यांच्या नेतृत्वा खालील संचालक मंडळ बरखास्त. प्रादेशिक सहसंचालक (साखर ) पुणे विभाग पुणे यांच्या आदेशाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ ( १ ) ( ब ) अन्वये प्रशासकीय अध्यक्षपदी श्री वसंत साळुंखे तर प्रशासकीय संचालक पदी तुषार दत्तात्रय शितोळे व संभाजी दत्तात्रय ताकवणे यांची नियुक्ती. यांच्या नियुक्तीने सभासदांच्यात आनंदाचे वातावरण दिसून येत आहे. सभासदांच्या उपस्थितीत आज दिनांक २४/०४/२०२६ रोजी कारखाना स्थळा वर संस्थापक अध्यक्ष स्व. मधुकर काका ▶▶ उर्वरित पान २ वर

# महावितरण अधिकाऱ्याची 'अरेतुरे'ची भाषा

# बिरुदेव गोचडे यांच्यातील संवादाची ऑडिओ क्लिप व्हायरल

**बीड । प्रतिनिधी**

लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेचा सन्मान राखण्याऐवजी, एका शासकीय अधिकाऱ्याने पत्रकाराशी उद्धटपणे वर्तन केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. लोकाशा टीव्हीचे पत्रकार बालाजी शिंदे यांनी महावितरणचे अधिकारी बिरुदेव गोचडे यांना जनहिताच्या प्रश्नावर विचारणा केली असता, गोचडे यांनी त्यांना 'अरेतुरे'ची भाषा वापरत अपमानास्पद वागणूक दिली. या संवादाची कॉल रेकॉर्डिंग सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्ह व्हायरल होत आहे.

**● नेमकी घटना काय ?**

**मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित भागातील तांत्रिक तक्रारीबाबत माहिती घेण्यासाठी बालाजी शिंदे यांनी बिरुदेव गोचडे यांना फोन केला होता. एक जबाबदार पत्रकार म्हणून प्रश्न विचारत असताना, समोरून अधिकाऱ्याने प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी अरेरावी सुरू केली. अशा स्वरूपाची भाषा वापरत गोचडे यांनी पत्रकाराच्या कामात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे या क्लिपमधून समोर येत आहे.**

**● पत्रकार वर्तुळात संताप**

शासकीय पदावर बसलेल्या व्यक्तीने अशा प्रकारे असभ्य भाषेचा वापर करणे हे त्यांच्या पदाला न शोभणारे आहे. या घटनेनंतर बीड जिल्ह्यातील पत्रकार बांधवांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. जनतेचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकाराला जर अशी वागणूक मिळत असेल, तर सामान्यांचे काय ? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या या क्लिपमुळे महावितरणच्या प्रशासकीय कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## बीड जिल्ह्यातील शिवसेना महिला आघाडीच्या परळी, अंबाजोगाई, केज तालुक्याची बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील शिवसेना पक्षाची महिला आघाडीच्या परळी, अंबाजोगाई, केज तालुक्याची बैठक दिनांक २५ एप्रिल रोजी शासकीय विश्रामगृह, अंबेजोगाई येथे संपन्न झाली. या बैठकीला शिवसेना मराठवाडा संपर्क प्रमुख अँड. संगिता चव्हाण यांनी संबोधित केले.



येणाऱ्या काळात कोणत्याही निवडणूक होणार नसल्याने शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब आणि शिवसेना नेत्या तथा विधान परिषदेच्या उपसभापती मा.ना. डॉ. निलम ताई गोऱ्हे, खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या आदेशावरून शिवसेना सचिव श्री संजय जी मोरे साहेब, आणि शिवसेना नेत्या सौ. मीनाताई कांबळी यांच्या सुचनेने महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री तथा शिवसेना मराठवाडा संपर्कप्रमुख मा.ना.श्री प्रकाशजी अबीटकर साहेब, बीड जिल्हा संपर्क मंत्री मा.ना.भरातसेठ गोगावले साहेब, शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव श्री. अशोकजी पटवर्धन साहेब, लोकसभा संपर्क प्रमुख मनोज जी शिंदे साहेब, उपनेत्या संगिता ठोंबरे, जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, चंद्रकांत नवले यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील शिवसेना संघटनेला अधिक बळकट करण्यासाठी आणि निवडणुकीची तयारी सशक्त ▶▶ उर्वरित पान २ वर

## शारदा हॉस्पिटलच्या आरोग्य शिबिरास तलवाडा येथे उत्स्फूर्त प्रतिसाद



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई येथील शारदा मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या तलवाडा येथील माध्यमिक विद्यालयात घेण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, जयभवानी शिक्षण संस्थेचे सचिव तथा शिवशारदा मल्टीस्टेटचे संस्थापक जयसिंग पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या शिबिराचा तलवाडा आणि पंचक्रोशीतील रुग्णांनी लाभ घेतला.

शिबिराचे उद्घाटन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक डॉ.आसाराम मराठे, माजी सरपंच विष्णू हात्ते, अक्रम सौदागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महेश मरकड, रवी मरकड, नजीर कुरेशी, पत्रकार अल्ताफ कुरेशी, राजाभाऊ डावकर , पत्रकार बापू गाडेकर, माऊली डोंगरे ,अंकुश यादव, शारदा हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. अजयसिंह पंडित, प्राचार्य अरुण हाटकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या शिबिरास उस्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला. तलवाडा व तलवाडा पंचक्रोशी मधून शेकडो रुग्ण या शिबिरामध्ये सहभागी झाले. या शिबिरामध्ये स्त्रीरोग, बालरोग, दंतरोग तसेच विविध आजारांवर तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत उपचार करण्यात आले. रुग्णांची मोफत रक्त तपासणी करुन विविध ▶▶ उर्वरित पान २ वर

## पाटोदा ग्रामीण रुग्णालयात पाणी संकट

## बोअर आटले, रुग्ण त्रस्त प्रशासनाने तात्काळ पाण्याची व्यवस्था करावी

**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात सध्या भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून रुग्ण, नातेवाईक आणि आरोग्य कर्मचारी यांचे प्रचंड हाल होत आहेत. रुग्णालयातील बोअरवेल पूर्णपणे आटल्यामुळे पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि दैनंदिन कामकाज यावर गंभीर परिणाम झाला आहे. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना पिण्याच्या पाण्यासाठी बाहेर धावपळ करावी लागत आहे. अनेकांना बाटलीबंद पाणी विकत घ्यावे लागत असून आर्थिक भारही वाढत आहे. विशेषतः वृद्ध, महिला आणि लहान मुलांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे.दरम्यान, डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांनाही मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.भर उन्हाळ्यात अशा प्रकारे रुग्णालयात पाणीटंचाई निर्माण होणे ही गंभीर बाब असून प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. रुग्णालयासारख्या अत्यावश्यक सेवांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे ही चिंतेची बाब आहे.या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने तात्काळ पाण्याची टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा तसेच कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## बीड शहर स्वच्छतेत आधुनिकतेची मोठी झेप

### घंटागाड्यांवर जीपीएस प्रणाली कार्यान्वित: स्वच्छता सभापती शेख निजाम

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेच्या स्वच्छता विभागात शहराच्या स्वच्छतेसाठी आणि कामकाज अधिक प्रभावी करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, स्वच्छता विभाग आणि नगरपालिका प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नातून शहरातील सर्व घंटागाड्या व स्वच्छता संबंधित वाहनांवर अत्याधुनिक ऋझड प्रणाली कार्यान्वित करण्यात आली



आहे. हा उपक्रम मा.ना.पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार, आमदार विजयसिंहराजे पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली, नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे, उपाध्यक्ष विनोद मुळूक, शेख मुजीबभाई, सभापती बाळासाहेब गुंजाळ, संजय उडाण, जकी सौदागर,गटनेता फारूक पटेल यांच्या सहकार्याने तसेच स्वच्छता सभापती शेख निजाम व मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत आहे. शहरातील वाढती लोकसंख्या आणि स्वच्छतेच्या वाढत्या गरजा लक्षात घेता, पारंपरिक पद्धतींमध्ये अनेक मर्यादा येत होत्या. या पार्श्वभूमीवर ऋझड प्रणालीचा अवलंब करून स्वच्छता व्यवस्थापनात सुसूत्रता, शिस्त आणि पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या प्रणालीच्या माध्यमातून प्रत्येक घंटागाडी व स्वच्छता वाहनाची ▶▶ उर्वरित पान २ वर

## टाकरवन येथील पाणीपुरवठा योजनेची चौकशी करून योग्य कारवाई करावी : कपील आडागळे

**तलवाडा । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथे राबवण्यात येत असलेली पाणीपुरवठा योजनेची कामे बनावट निकृष्ट दर्जाची आणि भ्रष्टाचाराने बरबटलेली असल्याचे आढळून आले आहे. जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मोजे टाकरवन ग्रामपंचायत अंतर्गत फुलसिंग नगर, होना नाईक तांडा, आणि टाकरवन तालुका माजलगाव



जिल्हा बीड येथील पाणी पुरवठा योजनेचे काम बोगस, दर्जाहीन, ▶▶ उर्वरित पान २ वर

**प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष**

**या गंभीर आरोपांमुळे जिल्हा परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आता प्रशासन याबाबत कोणती ठोस कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

## टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा मिळण्यास विलंब लागणार :वसंत मुंडे

**परळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ईडी व त्रिमूर्ती सरकारमधील आजी माझी कृषिमंत्र्यांनी व कृषी अधिकाऱ्यांनी पिक विमा कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याचा पिक विम्याचा प्रश्न प्रलंबित पडल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. शेतकऱ्यांनी जिल्हा, विभाग, राज्यस्तरीय



अनेक पुराव्यासहीत लेखी तक्रारी शासनाकडे दाखल करून उच्च न्यायालयापर्यंत विविध जिल्ह्यातील पिक विमा संदर्भात शासनाला व पिक विमा कंपन्यांना शेतकऱ्याचे पैसे त्वरित खात्यात वर्ग करण्याचे आदेश देऊनही कारवाई केली जात नाही. आर एस एस च्या विचारधारेचे केंद्रातील भाजप सरकार यांनी २०१६ पासून पिक विमा संदर्भात खाजगीकरण केले त्यामुळे ▶▶ उर्वरित पान २ वर

# शहीद कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?'

# पुस्तक प्रकरणी आ. संजय गायकवाड यांच्या प्रतिमेला 'जोडे मारो' आंदोलन

## बागेश्वरधामचे धीरेंद्र शास्त्री यांच्या वक्तव्याचाही निषेध : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

शहीद कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या संदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप तसेच पुस्तक वितरक प्रशांत आंबी यांना शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या निषेधार्थ लिंबागणेश येथे 'जोडे मारो' आंदोलन करण्यात आले. याचवेळी बागेश्वरधामचे धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि रामदास स्वामी यांच्या संदर्भात केलेल्या कथित तथ्यहीन वक्तव्याचाही तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. हे आंदोलन सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली पार पडले.

गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या शीर्षकावरून पुस्तक न वाचताच आक्षेपार्ह उद्गार काढल्याचा आरोप बुलढाणा येथील आमदार संजय गायकवाड यांच्यावर करण्यात आला आहे. तसेच कोल्हापूर येथील पुस्तक वितरक प्रशांत आंबी यांना व त्यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ करून घरात घुसून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला. या प्रकरणी आमदार संजय गायकवाड यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा व अटक करावी, अशी मागणी करण्यात आली. दरम्यान, धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज लढून थकले होते व त्यांनी राज्यकारभार रामदास स्वामींकडे सोपविला, असे कथित वक्तव्य केल्यामुळे शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या असल्याचे ▶▶ उर्वरित पान २ वर

